बुद्धाब्द: २५६८. आसाळ्हमासो-सावनमासो

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स

RNI क्रमांक – MHMUL/25/A1620

11 ऑगस्ट 2025 सोमवार 1

संपूर्ण महाराष्ट्रातून वितरित





# त्रिपिटक वार्ता

परिवर्तनाचं पहिलं पाऊल"

"परिवत्तनस्स पठमो पादो "

वर्ष १ ले, अंक ४

पृष्ठे ४, मूल्य १०

साप्ताहिक


**"पालि भाषेचे पुनरुज्जीवन आणि धम्म प्रचार प्रसारासाठी समर्पित" |**

अनुक्रमणिका

२ संपादकीय
२."पालि शिकूया बाबासाहेबांसोबत!"
३. मुख्य लेख
३. कथा, शिलालेख
४. बातम्या
४. वाचकांच्या प्रतिक्रिया

**🌸 बुद्ध वचनांचे गीत 🌸**

**अंधाराला ज्योत देणारा,**
**बुद्धांचा तो मार्ग दिव्य,**
**दुःखातून मुक्ती देणारा,**
**धम्मच आहे जीवन सव्य.**
**करुणेचा तो समुद्र अमर्याद,**
**मैत्रीची तोच गाथा गातो,**
**सत्याच्या शोधात चालताना,**
**मनुष्याला मानव बनवितो.**
**क्रोध, मत्सर, मोह विरहित,**
**शांततेचा संदेश देतो,**
**सर्व जीवांवर दया करावी,**
**असा तो उपदेश सांगतो.**
**जगण्यात आणा धम्माची किमया,**
**प्रेम, समता, न्याय फुलवा,**
**बुद्धाच्या या सुवर्ण मार्गे,**
**मानवतेचा दीप लावूया.**



## अजंठा-वेरूळ जागतिक बौद्ध पर्यटन केंद्र बनविण्याचा MTDC चा संकल्प

महाराष्ट्र शासनांतर्गत कार्यरत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (MTDC) अजंठा व वेरूळ या युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांना आंतरराष्ट्रीय बौद्ध पर्यटन परिक्रमेतील (Buddhist Circuit) प्रमुख तीर्थक्षेत्र आणि पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा आराखडा तयार केला आहे. ६ वा आंतरराष्ट्रीय बौद्ध संमेलन (२३–२६ ऑगस्ट २०१८, औरंगाबाद), या संमेलनात १२ पेक्षा अधिक बौद्ध-बहुल देशांमधील भिक्षु, प्रतिनिधी आणि अधिकारी सहभागी झाले. प्रतिनिधींनी अजंठा व इतर बौद्ध स्थळांना भेट दिली. अजंठा लेणी – २ रे ते ५ वे शतकादरम्यान खडक खोदून तयार केलेल्या ३० लेणी. भित्तीचित्रे व बौद्ध धार्मिक कला हे जगातील दुर्मिळ व प्राचीन नमुने.
वेरूळ लेणी – ५ वे ते १० वे शतकादरम्यान तयार झालेल्या ३४ लेणी. येथे बौद्ध, हिंदू व जैन धर्मीय मठ व मंदिरे आहेत."

महाराष्ट्राचे पर्यटनमंत्री जयकुमार रावल म्हणाले :
"बौद्ध पर्यटन हा झपाट्याने वाढणारा क्षेत्र आहे. या संमेलनामुळे महाराष्ट्रातील बौद्ध स्थळांना जागतिक ओळख मिळेल आणि जगभरातून बौद्ध पर्यटक महाराष्ट्रात येतील." MTDC ला अजंठा व वेरूळ येथील पर्यटक केंद्रांच्या दुरुस्ती, सुविधा आणि थकित विजे-पाण्याच्या बिलांसाठी ५ कोटी रुपयांचा सरकारी निधी मंजूर झाला आहे.

महाराष्ट्रातील अन्य बौद्ध वारसा स्थळे : ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, नालासोपारा स्तूप कन्हेरी लेणी, मुंबई, भविष्यातील आराखड्यांतर्गत, के. जे. सोमय्या सेंटर फॉर बौद्ध स्टडीज, मुंबई यांच्या सहकार्याने विशेष बौद्ध पर्यटन पॅकेजेस तयार होणार आहेत. MTDC चे व्यवस्थापकीय संचालक सुहास दिवसे म्हणाले. "जगभरातील प्रवाशांना महाराष्ट्रातील बौद्ध वारसा समजून घेता येईल आणि येथे येऊन ते भगवान बुद्धांच्या जीवनप्रवासाची अनुभूती घेतील.

## बौद्ध विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर

नागपूर : महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या वेळेवर हस्तक्षेपामुळे १२ बौद्ध विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली आहे. शासनाने ५२ लाखांपासून १ कोटी रुपयांपर्यंतच्या शिष्यवृत्ती रकमेची मंजुरी दिली आहे.

लाभार्थ्यांमध्ये सुमित जांभुळकर, निनाद जांभुळकर, कौशिक खोब्रागडे, प्रिन्सु धोणे, वरुण रामटेके, अभिजीत लोखंडे, पलक धोणे, सुकशिनी जीवणे, श्रावरी मेश्रॉम, इशिका इलमे, नितेश वानखेडे आणि यश यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल (यू.के.), युनिव्हर्सिटी ऑफ सिडनी व युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न (ऑस्ट्रेलिया) या नामांकित विद्यापीठांमध्ये सायबर सिक्युरिटी, एमबीए, कॉम्प्युटर सायन्स, इंटरनॅशनल बिझनेस, डेटा सायन्स व मास्टर ऑफ कॉमर्स या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणार आहेत.

या विद्यार्थ्यांनी राज्याच्या परदेशी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज केले होते, मात्र तांत्रिक अडचणी व प्रशासकीय विलंबामुळे मंजुरी लांबली होती. अखेरीस त्यांनी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष पयारे खान यांच्याकडे मदत मागितली. त्यांनी तत्परतेने प्रयत्न करून या सर्व अर्जांना वेळेवर मंजुरी मिळवून दिली.

शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी खान यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी खान यांनी त्यांना शुभेच्छा देत प्रेरणादायी शब्द सांगितले – "यशस्वी होण्यासाठी पहिलं पाऊल उचलणं सर्वात महत्त्वाचं असतं. पोहायला शिकायचं असेल तर बुडण्याची भीती जिंकावी लागते." तसेच, शिक्षण पूर्ण झाल्यावर भारतात परत येऊन देशसेवा करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

ही शिष्यवृत्ती योजना राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना जगातील सर्वोत्तम २०० विद्यापीठांत शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देते. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी वयोमर्यादा ३५ वर्षे आणि पीएच.डी. साठी ४० वर्षे आहे. वार्षिक कुटुंबीय उत्पन्नाची कमाल मर्यादा ८ लाख रुपये आहे.







*पंढरपूर - वर्षावास कार्यक्रम टाकळी येथे संपन्न*

भारतीय बौद्ध महसभा व भीम ज्योत तरुण मंडळ भीमज्योत युवती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने वर्षावास धम्म प्रवचन कार्यक्रम टाकळी येथे संपन्न.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस भगवान बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमाना कार्यक्रम अध्यक्ष राहुल चंदनशिवे यांनी पुष्पहार अर्पण करून व दीप प्रजोलित करून करण्यात आली. सर्व उपासक व उपासिका यांनी सामूहिक रित्या पंचशील त्रिशरण ग्रहण केले. सूत्र संचलन एडव्होकेट प्रियदर्शन चंदनशिवे यांनी करून सर्व मान्यवरांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करून करण्यात आले

भगवान बुद्धांचा कर्म सिद्धांत याविषयी सखोल मार्गदर्शन केंद्रीय शिक्षक आयु. जितेंद्र आठवले यांनी केले आपण केलेल्या कर्माचे आपल्याला फायदे व तोटे कसे होतात याची माहिती दिली. वर्षावासाचे महत्त्व आयुष्यमान. राजेंद्र सर्वगोड यांनी सांगितले कार्यक्रमाची प्रास्ताविक सौ पल्लवी प्रियदर्शन चंदनशिवे यांनी केली. समता सैनिक दलाचे सभासद नोंदणी व शिबिराची माहिती तसेच भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 24 प्रकारच्या शिबिराची माहिती हणमंत बंगाळे यांनी दिली. गुणवंत मुलांना व मुलीना शालेय साहित्य वाटप करण्यात आले

कार्यक्रमांस उपस्थित भारतीय बौद्ध महासभा पंढरपूर तालुका अध्यक्ष समाधान जाधव शहराध्यक्ष राहुल सर्वगोड तसेच संस्कार सचिव दत्तात्रय भोसले एडवोकेट राहुल पाटील समता सैनिक दल आकाश वाघमारे नितीन बंगाळे पाली अभ्यासक नरेंद्र सरवदे

तसेच भिमज्योत युवती मंडळ सचिव सौ प्रज्ञा चंदनशिवे, सहसचिव सौ राणी चंदनशिवे, खजिनदार सौ रोहिणी चंदनशिवे, गैदरिंग प्रमुख सौ ललिता चंदनशिवे, विज्ञान बाबर, नितीन चंदनशिवे, सागर चंदनशिवे, सुधाकर चंदनशिवे, अनिल चंदनशिवे, पृथ्वीराज उबाळे सुकन्या चंदनशिवे अंकिता चंदनशिवे सही चंदनशिवे मानसी चंदनशिवे सलोनी चंदनशिवे सायली चंदनशिवे तनुजा चंदनशिवे तसेच

सर्व पदाधिकारी व उपासक- उपासिका उपस्थित होते. उपस्थितांचे आभार पल्लवी सुधाकर चंदनशिवे यांनी मानले कार्यक्रमाच्या शेवटी शरणतंय गाथा घेऊन

**त्रिपिटकवार्ता साप्ताहिकाचे सदस्यत्व खुले आहे!**

पालि भाषा, संपूर्ण त्रिपिटकाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण, बौद्ध शिक्षण, धम्म व आंबेडकरी विचारांचा अभ्यासपूर्ण वारसा – दर गुरुवारी आपल्या घरी!

साप्ताहिक प्रकाशन – प्रत्येक गुरुवारी

सदस्यत्व शुल्क:

🔹 3 महिन्यांचा कालावधी:
जुलै 2025 ते डिसेंबर 2025
🔹 3 महिने: ₹125 (पेपर) + ₹25 (पोस्टल चार्जेस) = *Total- ₹150 /-rs*
🔹 6 महिन्यांचा कालावधी:
जुलै 2025 ते डिसेंबर 2025
🔹 6 महिने: ₹250 (पेपर) + ₹50 (पोस्टल चार्जेस) = *Total- ₹300/-rs*
🔹 12 महिन्यांचा कालावधी:
जुलै 2025 ते 30 जुलै 2026
🔹 1 वर्ष: ₹400 (पेपर) + ₹100 (पोस्टल चार्जेस ) = *Total- ₹500* /-rs

'त्रिपिटकवार्ता' हे साप्ताहिक – पालि भाषा, बुद्ध, धम्म आणि सामाजिक परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण आवाज!

आपला अंक राखीव ठेवण्यासाठी खालील लिंक भरावी किंवा थेट संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी संपर्क:
संपर्क प्रमुख – *सतीश पवार*
📲 मो. 9139509355
👉 मोठ्या प्रमाणात अंक लागणाऱ्यांनी थेट वरील नंबरवर संपर्क साधावा.
नमो बुद्धाय | जयभीम

**TRIPITAK VARTA**
**साप्ताहिकासाठी पेमेंट माहिती**

बँकेची तपशीलावर माहिती :
🔹 Account Name:
Tripitak Varta
🔹 Bank Name:
Bank of Baroda
🔹 Account No.:
04510200001417
🔹 IFSC Code:-
BARB0SHIPOO
BANK OF BARODA,
SHIVAJI NAGR BRANCH
💬 पेमेंट झाल्यानंतर कृपया आपले नाव आणि स्क्रीनशॉट 9139509355 या WhatsApp नंबरवर पाठवा.
🙏 आपले सहकार्य आम्हाला बौद्ध शिक्षण व समाजप्रबोधन कार्यात बळ देईल.




**लेख: राकेश सदानंद पवार. 9867355724 अंधेरी- (मुंबई)**
**लेणी संवर्धक / अभ्यासक**
**एकजुट अभ्यास प्रचार समूह महाराष्ट्रराज्य-लेणी संवाद.**
**सदर्भ : डोंगर दरीतला फिरस्ती.**




सातारा-कराड परिसरातील निर्सगाच्या कुशीत लपलेली अपरिचित चचेगाव बुद्ध लेणी समूह.

सातारा जिल्हाच्या कराड तालुक्यातिल निर्सगाचा, डोंगराचा कुशीत लपलेली अपरिचित चचेगाव बौद्ध लेणी समूह. भारतात १२०० च्या आसपास लेण्या सापडतात, त्यातच महाराष्ट्रात १००० या आसपास सापडतात. त्यातिल एक अपरिचित लेणी निर्सगाचा डोंगराच्या कुशीत लपून राहीली आहे. आणि आता जनमाणसात माहीत पडत आहे. सातारा हे महाराष्ट्रामधे येते. सातारा हे कृष्णा – वेण्णेच्या संगमावर वसलेले आहे. सातारा हे शहर जिल्ह्यातिल हे सर्वात मोठे शहर आहे. सातारा जिल्ह्याला मोठी ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक वारसा लाभला आहे. सातारा जिल्ह्याने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ती म्हणजे हया बहुतेक गांवामध्ये जिल्ह्यातील बहुतांश गावानमधे भारतीयसेने मध्ये भरती होण्याची परंपरा आहे, ती जपतात त्यामुळेच साताऱ्याला शूरवीरांचा जिल्हा अशी ओळख आहे. साताऱ्याला सैनिकांचे शहर म्हणून ओळखले जाते. तसेच कासपठार रंगी, रंगीत विविध फुलासाठी प्रसिद्ध आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर या महिन्यात फुलाचा बहार असतो. पर्यटकाची पाहण्यासाठी त्या कालात ओढ असते.

सातारा शहराला सातारा नाव का पडले अनेक मत , दंत कथा आहेत. असे बोलले जाते की या शहरा भोवती अंजिक्यतारा, सज्जनगड, यवतेश्वर, जरंडेश्वर, नाकडीचा डोंगर, किटलीचा डोंगर आणि पेंडपा भैरोबा या सप्त पर्वतरांग आहेत. या सात डोंगराच्या टेकड्यांमुळे सात आणि अंजिक्य तारा मधून तारा असा मिळून सात + तारा = सातारा हे नाव अपभ्रंश होवून पडले असावे अभ्यासकांचे मत आहे. तसेच वेगवेगळ्या दंत कथा ही आहेत नावा संर्दभात. कऱ्हाड हे सातारा जिल्ह्यातील एक तालुक्याचे गाव आहे. ह्यालाच कराड म्हणतात. कृष्णा आणि कोयणेच्या संगमावर वसलेले गाव. त्या संगमाला प्रीतिसंगम' म्हणून ओळखले जाते. या नंघाचा उगम महाबळेश्वर येथे झाला आहे. तसेच कोयनेला करहा असे प्राचीन काळी बोलत. करहेच्या काठी असलेले करहाटक त्यावरून करहाट, करहाड, कराड नावे पडली असावी असे अभ्यासकांचे मत आहे. या परिसरात आगशीव डोंगरात १०८ लेण्या आहेत. त्यातिल ५६ लेण्या सहसा पाहण्यास मिळतात. जरी ५६ लेण्या असल्या तरी चचेगाव, जखिणवाडी, वाई मधील लोहारे, आगाशिव लेणी वेगवेगळ्या अशा वेगवेगळ्या टप्प्यात आहेत. सध्या त्या ५६चा एकत्र गट म्हणून उल्लेख आहे. त्यात आगाशीवनगर लेणी क्र. ४७ मधे शिलालेख असल्याचा उल्लेख सापडतो, पण नक्की कोठे ही संशोधनाची बाब आहे.

ऑस्ट्रेलियन आर्किओलोजीरर आपल्या the hidden ancient history of India ह्या पुस्तकाच्या संदर्भ नुसार सातारा, कराड मधे १०८ बौध्द लेणी आहेत. या 2000 वर्षा पूर्वी कोरल्या आहेत. इथे विशेष करुण सम्राट अशोक हयांचे २६ आऱ्याचे धम्म चक्र पाहण्यास मिळते. तसेच स्तूप पाहण्यास मिळतात, भिकू विहार, निवास पाहण्यास मिळतात. या वरून सातारा-कराड हा परिसर बुद्ध विचाराने ओतप्रोत भरला होता. ह्याच साताऱ्या शहरातील कराड तालुक्यातील १०८ लेण्या मधील चचेगाव बुद्ध लेणी समूह. हा लेणी समूह या गावातिल ग्रामस्त आणि लेणी संवर्धक त्यांचा टिमणे शोधून काढली, या लेणीची दूर अवस्था झाली आहे. येथील स्थानिक लेणी संर्वधन समूहाने, या लेणीवर वेळ मिळेल तसे जावून साफ - सफाई करून काही प्रमाणात पहाण्या योग्य केली आहे. या लेणीवर जाण्यासाठी आडवाटेवरील पाऊलवाटा आहेत. अजून निट रस्ता नाही आहे. झाडा, झुडपानी आच्छादलेला " परिसर आहे. त्यातून मार्गस्त करत साधारण अर्धा तासात आपण लेणीचा जवळ पोहचतो. हया लेणीवर पोहचल्यावर प्रथमता चैत्यगुह दिसते. हया लेणीत अर्धवट स्तूप असून तो तोडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. चैत्यगुहाचा डाव्या बाजूला दोन छोटया लेण्या, त्यापुढे विहार, सभामंडप आहे. विहार, सभामंडपाचा आत उजव्या, डाव्या आणि समोरील भिंतीत पाच, पाच खोल्या आहेत. भिकुणा ध्यान धारणा आणि निजन्यासाठी, त्यातिल भिंतिचा उजव्या, डाव्या भिंतीतील खोल्या भग्न झाल्या आहेत. समोरिल भिंतित पाच खोल्यानमधे दोन्हीबाजूचा एक, उजव्या, डाव्या खोल्यांचा आत एक, एक अशा दोन खोल्या आहेत. मधे सभामंडपात अजून मातिने भरलेले आहे. तिथे उत्खनन होणे गरजेचे आहे. हा सभामंडपा पुढे एक विहार आहे. याचा आत भिंतिमधे भिंतीचा डाव्या कोपऱ्यात दोन खोल्या आहेत हे विहार सुद्धा जमनिवर मातीचा खच आहे तो साफ करणे गरजेचे आहे. चैत्यगुहाचा उजव्या बाजूला दोन आणि डाव्या बाजूला दोन, अशा चार लेण्या मातिने भरलेल्या आहेत. अशा सात लेण्यांचा समहू पाहण्यास मिळतात.

तसेच चैत्यगुहाचा उजव्या बाजूला दोन लेण्या आहेत. त्यापुढे अजून दोन लेण्या आहेत. त्या पूर्णता मातीचा ढीघाऱ्याखाली आहेत.

स्थानिक लेणी संवर्धक, ग्रामस्त त्यांचा कडून माहीती मिळते. तसे पाहता लेण्यानमधे मातीचा ढिग पडला आहे. खच पडला आहे. ती पूर्णता साफ केलास, अधिक माहिती , भग्न अवशेष, मिळू शकतात. असे निरीक्षणावरून दिसते. कराड रेल्वे स्थानक पुणे-मिरज रेल्वेमार्गावर असून रेल्वे गाड्याना थांबा आहे. कराड - सांगली ४५ कि.मी. आहे. ५२ कि.मी. आहे कराड - सातारा अंतर कराड - कोलहापूर अंतर ७५ कि.मी. आहे. मुंबई ते कराड 308 कि.मी आहे. मुंबईतून ट्रेन आणि बसणे जाता येते.

ह्या या लेणीवर निट रस्ता नसल्यामुळे स्थानिक ग्रामस्त लेणी संवर्धक हयांना सोबत घेवून जावे. तसेच गर्द झाडी असल्यामुळे हिंस्त्र प्राण्यांचा वावर आहे. या लेणीवर मातीचे उत्खनन करुण साफ सफाई करणे 'गरजेचे आहे. इथे निट रस्ता बनवणे गरजेचे आहे, तसेच माहीती फलक लावणे गरजेचे आहे त्यामुळे पर्यटकांना इथपर्यंत पोलचणे सुलभ होईल. आपला जागतिक, भारतीय वारसा, धरोवर जनमाणसात माहीत पडून, पाहता येईल आपल्याला आणि पुढच्या पिढीला पाहता येतील.

---

**पंडीत एम. सपकाळ , Mo.No- 9860874637,**
**प्लॉट नं-21/1 गट नं.-177, शिवशंकर हाऊसींग सोसायटी जवळ**
**सावखेडा शिवार -वाघनगर जळगांव, जळगांव-425002**

## *पालि तिपिटक गन्थ*

पालि वाङःमयाचे सविस्तर समिक्षण करण्या पूर्वी त्रिपिटाकाची संक्षिप्त कल्पना येणे आवश्यक आहे. पालि त्रिपिटक हे तथागताच्या महान कल्याणकारी बुध्दवचनांचा संग्रह असलेल्या सुत्त,विनय आणि अभिधम्म या ग्रंथ समुहांचा संग्रह यालाच पिटक म्हणजे पेटारा असे म्हटले गेले आहे. पिटक म्हणजे परंपरा कशाची परंपरा? तर तथागत बुध्दांच्या वचनाला सुरक्षित ठेवण्याची परंपरा बुध्दवचनाला सुरक्षित करण्यासाठी बुध्दापासुन ते चवथ्या संगिती पर्यंत ही परंपरा चालत राहीली आहे. परंपरेचा अर्थ आहे. एटा पिढीपासुन दुसर्या पिढीकडे आधीच्या संप्रदाया पासुन पुढच्या संप्रदायाकडे संग्रहित धम्म सिध्दांत पोहचविण्याची व्यवस्था बुध्दवचने ही मानवाला जीवनातील दुःखमुक्तीचा मार्ग दाखवून निर्मळ अशा निर्वाणाकडे घेऊन जातात.कर्मकांडे आणि अवास्तविक्ता त्यागून एका व्यक्तीने दुसर्यांशी कसा व्यवहार करावा, त्याने स्वतःला शारिरीक, मानसिक आणि वाचिक दृष्टीने कसे सांभाळावे हे बुध्दवचनांत शिकवीले आहे.

पालि साहित्याचा अभ्यास केल्याने एक परिपूर्ण मानव बनण्याची प्रक्रिया आरंभ होते. वेदांमधील छांदस भाषा आणि त्यावेळेच्या भारतीय बोलीभाषा यांच्या मिश्रणातुन संस्कृत साहित्याची भाषा आणि पालिभाषा विकसित कशी झाली हे पालि भाषेच्या अभ्यासातून कळते.

म्हणुनच आज पालि त्रिपिटक साहित्याचे महत्व आहे. तथागत बुध्दांनी त्यांच्या महापरिनिर्वाणा पर्यंत धम्म व विनयालाच अधिक महत्व दिलेले आहे. त्यानंतर त्यांच्या शिष्यांनी बुध्दवचन नावाने ज्याने एकत्रिकरण केले ते धम्म व विनयाचेच होते. म्हणुन त्रिपिटकांत सर्वात अधिक महत्वपूर्ण धम्म आहे. हे पिटक इतिहास व साहित्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. संपूर्ण पालि त्रिपिटक देवनागरी लिपी मध्ये पुन्हा प्रकाशित करण्याचे महान कार्य कल्याणमित्र सत्यनारायण गोयंकाजी गुरुजी द्वारे स्थापित विपस्यना संशोधन संस्था इगतपुरी यांनी पूर्ण केले आहे. बुध्दधोषाचार्यांनी पिटक याचा दिलेला वैकल्पित अर्थ आहे. पिटारी किंवा परंपरा हे तिन्ही पिटक परंपरेने समाजाचे मार्गदर्शक व संरक्षक ठरतात. बुध्दाचे ज्ञान अनंत होते. पण यामध्ये बौध्द तत्वज्ञान संक्षेपात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. थेरवादी बौध्द परंपरे नुसार त्रिपिटकाला बुध्दवचन मानले जाते. पुढील काळात काही अर्थकारांनी त्रिपिटकांवर अर्थकथा लिहुन संपूर्ण त्रिपिटकावर अधिक प्रकाश टाकला. त्याच बरोबर पिटकेतर व अनुपिकाचाही समावेश झाल्यामुळे बौध्द साहित्य हे भारतातील तसेच अत्यंत विशाल व गंभीर नीतिमूल्यांवर आधारित साहित्य समजण्यांत येते.

तथागत बुध्दांच्या उपदेशाचा प्रथम संग्रह त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर चवथ्या महिन्यांत राजगृह येथील वैभार पर्वतावरिल सप्तपर्णी गुंफामध्ये भदन्त महाकश्यप यांच्या अध्यक्षते खाली भरलेल्या प्रथम धम्मसंगिती मध्ये 500(पाचशे) अर्हंत भिक्खुंच्या उपस्थित झाला. त्यांत धम्म व विनयाचे संगायन केले गेले . ज्याला बौध्द परंपरे मध्ये " धम्म आणि विनय " म्हटले गेले या संगिती मध्ये पालि तिपिटक हे पाठांतर स्वरुपात होते, लिखित स्वरुपात नव्हते. प्रथम धम्म संगितीपासुन तिसर्या धम्म संगिती पर्यंत मुखोद्गत परंपरेने पालि त्रिपिटकाचा रचना काळ ईसवी सनपूर्व पहिल्या शतकापर्यंत स्थीर झाला. पालि साहित्याच्या या प्राथमिक एकीकरणामध्ये सर्वाधिक आवश्यक अशा बुध्दांकडुन ग्रहण केलेले 82000 धम्मस्कंध (सुत्त) आणि प्रज्ञावान अर्हंत स्थविरांचे 2000 धम्म स्कंध सुत्ताचे संग्रहन करण्यात आले आणि विषयानुसार त्यांचे तीन भागात विभाजन केले आहे. १. सुत्त पिटक , २. विनय पिटक ३. अभिधम्म पिटक. यालाच 'त्रिपिटक' असे संबोधले गेले. अशा या तथागत बुध्दांच्या उपदेशांचा सर्वात मोठा भाग त्रिपिटकांत संकलित केला गेला आहे . संगायन करण्याचा हेतू भविष्यांमध्ये भगवंतांच्या कल्याणकारी वचनामध्ये कोणीहि मिश्रण करु नये हा आहे. भगवान बुध्दांनी कोणताही ग्रंथ लिहिलेला नाही. त्रिपिटकामध्ये भिक्खुंनी सामाजिक आदर्शासाठी पाळावयाचे नियम आणि अधिकार व कर्तव्याचे परिपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले त्याला विनय पिटक संबोधण्यात आले. या कार्यामध्ये विनयधर महास्थवीर उपालि यांनी मोठे योगदान दिलेले आहे. ज्या भागात मध्ये समाज आदर्श व्हावा म्हणुन काय करावे याचे सांगोपांग मार्गदर्शन म्हणजे सामान्य सुत्त (उपदेश) करण्यात आले. त्या ग्रंथाला सुत्तपिटक संबोधण्यात आले. या विषयीची जबाबदारी धम्मधर महास्थवीर आनंद यांना सोपविण्यात आली होती. ज्या भागामध्ये शरिर व चित्त संबंधीत म्हणजेच आदर्श मानवीय धारणा धारण करण्यांसाठी परिपूर्ण मनोवैज्ञानिक मार्गदर्शन (उपदेश) संग्रहित करण्यात आले. त्या ग्रंथाला अभिधम्म पिटक संबोधण्यात आले. अभिधम्माची जबाबदारी मातिकाधर महास्थवीर महाकश्यप यांनी सांभाळली होती. हेच समाजाच्यि निर्मितीचे तीन आदर्श म्हणजे 'त्रिपिटक'होय. तथागत बुध्दांच्या महापरिनिर्वाणापर्यंत पालि त्रिपिटक अस्तित्वात आलेले नव्हते. सदरील घटकांमध्ये या तीनही ग्रंथाविषयी सविस्तर माहीती देण्यात आलेली आहे.

"त्रिपिटक एक महान ज्ञानसागर आहे . त्याला पार करावयाचे असेल तर शील, समाधी णि प्रज्ञेची आवश्कता आहे. त्याशिवाय हा धम्माचा महासागर पार करता येणे सोपे नाही ."

हे विपुल साहित्य बौध्द विद्यार्थ्यासाठी तसेच संशोधन कर्त्यासाठी अतिशय महत्वाचे आहे.)

---

# प.पु.बोधिसत्व "डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथांमधील पालि भाषा, संभाषण व व्याकरण : एक अभ्यासमालिका"

**पालि – English – मराठी – हिंदी**

मनुस्सा – Human Being – माणूस – मनुष्य ,
दारको – Boy – मुलगा – लड़का
कुमारो – Young Man, Boy – मुलगा, तरुण – लड़का,
लुद्धो – Miser – कंजूस – कंजूस
मच्छरी – Miser – कंजूस – कंजूस
योगी – Yogi – योगी – योगी
पीठसम्पी – Cripple – अपंग – अपंग
मुनि – Sage, Ascetic – मुनि, तपस्वी – मुनि, तपस्वी
समणो – Monk – संन्यासी – सन्यासी
वामनो – Dwarf – ठेंगणा – बौना
समणी – Nun – संन्यासिनी – सन्यासिनी
भिक्खुणी – Nun (Buddhist) – भिक्खुणी (संन्यासिनी) –
अरि – Enemy – शत्रू – शत्रु
सपत्तो – Enemy – शत्रू – शत्रु
धाती – Nurse – परिचारिका, दाई – नर्स, दाई
पण्डको – Eunuch – नपुंसक – नपुंसक
महल्लको – Old Man – वृद्ध पुरुष – वृद्ध पुरुष
बालो – Fool – मूर्ख – मूर्ख
मुळ्हो – Fool – मूर्ख – मूर्ख
महल्लिका – Old Woman – वृद्ध स्त्री – वृद्ध महिला
मित्तो – Friend – मित्र – मित्र
राजपुत्तो – Prince – राजपुत्र – राजपुत्र
दारिका – Girl – मुलगी – लड़की
कुमारी – Maiden, Girl – मुलगी, कुमारी – कुमारी, लड़की
राजधुता – Princess – राजकन्या – राजकुमारी
तापसो – Hermit – तपस्वी – तपस्वी
राजिनी – Queen – राणी – रानी
महेसी – Queen – राणी – रानी
थनपो – Infant – अर्भक, लहान बाळ – शिशु
सेवको – Servant – नोकर – नौकर
राजा – King – राजा – राजा
भूपति – King – राजा – राजा
खत्तियो – Warrior, Kshatriya – योद्धा, क्षत्रिय – योद्धा, क्षत्रिय
सामी – Lord, Master – स्वामी, मालक – स्वामी, मालिक
अधिपति – Lord, Ruler – प्रभू, स्वामी – अधिपति, स्वामी
विधवा – Widow – विधवा – विधवा
मतभरियो – Widower – विधुर – विधुर
युवती – Young Woman – तरुणी – युवती
तरुणी – Young Woman – तरुणी – युवती
पण्डितो – Wise Man – पंडित – पंडित



## पाली भाषेला मिळालेला अभिजात दर्जा टिकवण्यासाठीच्या उपाययोजना

बौद्धाचार्य आयु. धर्मा दशरथ गरड (सर)
— शैक्षणिक पात्रता : एम.ए. (पाली), UGC NET — बी.कॉम —
GDC & A WITH CHM — डिप्लोमा इन धम्मलिपी —

भारत सरकारने 3 ऑक्टोबर 2024 रोजी पाली सह अन्य चार भाषांना अभिजात दर्जा दिला आणि संपूर्ण पाली भाषा अभ्यासक, संशोधक शिक्षक, प्राध्यापक आणि पाली भाषेवर नितांत प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला खूप आनंद झाला, कारण पाली भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून बऱ्याच जणांनी यासाठी खूप प्रयत्न देखील केले होते, पत्रे, निवेदने ,विनंती अर्ज ,चर्चासत्र, सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिजात दर्जा मिळावा म्हणून सातत्याने पाठपुरावा केला जात होता,त्यामुळे हा अभिजात दर्जा म्हणजे या सर्व भाषा हितचिंतकांचा विजयच म्हणावा लागेल . असो ! आता पाली भाषेला मिळालेला हा अभिजात दर्जा , पण तिचा प्रचार प्रसार करण्यासाठी पुढे काय करावे याबाबत बऱ्याच जणांच्या मनात बऱ्याच कल्पना आहेत.

*स्पष्टीकरण विश्लेषण* - सर्वप्रथम पाली भाषेला ज्ञानभाषा किंवा त्या भाषेतील तथागत भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुढील उपाययोजना करणे गरजेचे वाटते.

१) पाली भाषेचे भांडार म्हणजेच त्रिपिटक, अनुपिटक , अट्ठकथा, टीका या सर्वांचे पुनर्लेखन करणे , त्यांना डिजिटायझेशन करून पाली भाषा अभ्यासक, जाणकार यांच्याकडून भारतातील प्रमुख भाषांमध्ये अनुवाद (भाषांतर )करणे. २) संस्कृत प्रमाणेच आता पालीभाषा देखील शालेय अभ्यासक्रमांमध्ये कंपल्सरी (अनिवार्य) भाषा विषय म्हणून अंतर्भूत करणे.

३) BA, MA in Pali बरोबरच , पाली प्रचार करण्यासाठी या भाषेतील छोटे छोटे पदविका/ डिप्लोमा कोर्सेस तयार करणे. उदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पाली विभागात अनेक पदविका कोर्सेस शिकवले जात आहेत.

४) यूजीसी नेट इन पाली( UGC NET in Pali ) प्रमाणेच प्रत्येक राज्यांनी आपापल्या सेट परीक्षेत पाली या विषयाचा समावेश करणे, म्हणजे करिअर म्हणून देखील विद्यार्थी पाली कडे वळतील .

५) वरील मुद्द्याला अनुसरूनच ज्युनियर आणि सिनियर कॉलेजमध्ये देखील पाली भाषा विषय समाविष्ट करणे त्यामुळे पाली या विषयात नेट आणि सेट करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राध्यापक म्हणून संधी प्राप्त होईल.

६) स्पर्धा परीक्षा उदा. UPSC,MPSC पोलीस भरती अशा स्पर्धा परीक्षांमध्ये देखील पाली भाषेचा समावेश करावा म्हणजे त्यातील तत्वज्ञान वाचून भविष्यातील कर्मचारी हा शीलपालन, शुद्ध आचरण, नैतिक सदगुण पालन करणारा होईल.

७) पाली भाषेमध्ये संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी यूजीसी ने पीएचडी चा कोटा वाढवावा जेणेकरून देश विदेशातील जास्तीत जास्त विद्यार्थी पाली भाषेत संशोधन करून तिचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करतील.

८) दर वर्षी देश विदेशातील विद्यार्थी देखील पाली भाषा शिकण्यासाठी भारतात येत असतात, परंतु त्यांची संख्या फार कमी आहे यासाठी भारतातील विद्यापीठांमध्ये खास परदेशी विद्यार्थ्यांकरिता *पाली भाषा विद्यार्थी कोटा* तसेच अन्य सोयी सुविधा याबाबत तरतूद आणि त्याची अंमलबजावणी व प्रभावी जाहिरात करणे.

९) केंद्र व राज्य सरकारने *पाली भाषा विभाग* सुरू करून तिचा प्रचार प्रसार, संवर्धन यासाठी गुणात्मक उपाययोजना करून त्याचा प्रचार करणे उदा. पुस्तके, साप्ताहिके , शब्दकोश, लेख प्रकाशित करने ,स्कॉलरशिप , फेलोशिप देणे इत्यादी.

१०) पाली भाषेच्या विकासासाठी तिच्यात गोडी , आवड निर्माण करण्यासाठी परिषदा, चर्चासत्रे ,निबंध स्पर्धा ,वक्तृत्व स्पर्धा, पाली गीत गायन, लेखन स्पर्धा, धम्मपद वाचन, सुत्तवाचन स्पर्धा आयोजित करणे , जेणेकरून पाली भाषेला सर्वसामान्यता प्राप्त होण्यास व तिच्याबद्दलचा धार्मिक न्यूनगंड कमी होण्यास मदत होईल.

११) सोशल मीडिया ,AI म्हणजेच आर्टिफिशल इंटेलिजन्स यांचा प्रभावी वापर करून पाली भाषेचा दर्जा उदा. महामंगल सुत्त, पराभव सुत्त, जातक कथा, चित्त, चेतसिक , रूप ,निब्बाण यांचा सार जनसामान्यांपर्यंत प्रसारित करणे सोपे होईल.

१२) ज्याप्रमाणे महाराष्ट्र शासन आणि बार्टी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे तसेच अन्य महापुरुषांच्या लेखनांचे ग्रंथ हे खंड स्वरूपात उपलब्ध करून देते अगदी त्याचप्रमाणे संपूर्ण त्रिपिटक देखील अशाच खंड पद्धतीने प्रकाशित करणे .

१३) दरवर्षी स्थानिक स्तरावर म्हणजे तालुका, जिल्हा, शहर , राज्य आणि केंद्र या स्तरावर पाली भाषेचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव करावा त्यासाठी एखादा पुरस्कार प्रदान करण्यात यावा जेणेकरून इतरही या भाषेच्या प्रचारासाठी प्रेरित होतील. उदा. ***पाली मित्र , पाली प्रचारक पुरस्कार*** वरील नमूद केलेल्या उपाययोजनांवर पूर्वी देखील काम झालेले आहे परंतु त्याच्यामध्ये एकसूत्रता,एकसारखेपणा ,अधिकृतता Authentication दिसत नाही , उदा.एखादा लेखक, एखादी संस्था ,एखादा पालीभाषा प्रेमी, अभ्यसाक आपापल्या सोयीप्रमाणे हे कार्य करत गेला आहे, त्यामुळे शासनाने पुन्हा एकदा नव्याने पण पहिल्यापासून हे कार्य हाती घेतले पाहिजे आणि येणाऱ्या पिढीला काहीतरी अमूल्य ठेवा जतन करून ठेवल्याचे महान कार्य केले पाहिजे.

समारोप

तथागत भगवान गौतम बुद्धांनी स्यक संबोधी नंतर आपल्या ६० अर्हत भिक्षुसंघाला , शिष्यांना आदेश दिला होता, *चरथ, भिक्खवे, चारिकं बहुजनहिताय बहुजनसुखाय लोकानुकम्पाय अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं. मा एकेन द्वे अगमित्थ. देसेथ, भिक्खवे, धम्मं आदिकल्याणं मज्झेकल्याणं परियोसानकल्याणं सात्थं सब्यञ्जनं केवलपरिपुण्णं परिसुद्धं ब्रह्मचरियं पकासेथ.* म्हणजेच थोडक्यात सार असा की "हे भिक्षुंनो बहुजनांच्या हितासाठी बहुजनांच्या सुखासाठी लोकांवर अनुकंपा करण्यासाठी देवांच्या आणि मनुष्यांच्या कल्याणासाठी धम्मोपदेशाचा प्रसार करावयास भ्रमण करा प्रारंभी कल्याणप्रद मध्यंतरी कल्याणप्रद आणि शेवटी ही कल्याणप्रद अशा या धम्म मार्गाचा अर्थ आणि व्यांजनांच्या भावासहित परिशुद्ध या धम्माचा , ब्रम्हचर्य राखून त्याला प्रकाशित करा " आणि हे तत्वज्ञान सांगताना कोणत्या एका भाषेचा आग्रह करू नका तर पाली भाषेतील हे तत्वज्ञान लोकांच्या जनभाषेमध्ये, स्थानिक भाषांमध्ये समजून सांगा त्यासाठी उदार भूमिका घेऊन तथागत बुद्धांनी आपल्या भिक्षू संघाला जणू आदेश दिला होता " अनुजानामि भिक्खवे , सकाय निरुत्तिया परिया पुणितुं ति."* म्हणजे "हे भिक्षुंनो मी तुम्हाला धम्मोपदेशाच्या प्रवचनासाठी आपल्या जनभाषेचा वापर करण्याची अनुज्ञा देत आहे "आणि भिक्षू संघाने देखील तथागतांचा तो आदेश तंतोतंत पालन केल्यामुळे भारतातील पाली भाषेत असणारे तथागतांचे मानवतावादी, अहिंसावादी, समतावादी, मैत्रीपूर्ण, बंधुतावादी न्यायवादी असणारे तत्त्वज्ञान संपूर्ण भारतासह आशिया खंडामध्ये कोणताही भाषिक, धार्मिक वादविवाद न होता अगदी नदीच्या प्रवाहाप्रमाणे प्रसार पावले. कारण भाषेपेक्षा तथागताचे सम्यक तत्त्वज्ञान हे महत्त्वाचे होते. आता देखील २६०० वर्षांनंतर पुन्हा एकदा पाली भाषेतील हे धम्मतत्त्वज्ञान भारतात आणि जगभर प्रसार प्रचारासाठी पाली भाषेचा अभिजात दर्जा निमित्त बनू पाहत आहे आणि म्हणूनच आपण देखील तथागतांच्या संघाप्रमाणे ही पाली भाषा त्याच तन्मयतेने कर्तव्य निष्ठेने जनसामान्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे .केवळ "जगाला युद्ध नको बुद्ध हवा" हे बोलणे वेगळे आणि त्यासाठी दर्जात्मक कार्य करणे वेगळे आणि ही संधी पालीच्या अभिजात दर्जाने पुन्हा एकदा मिळाली आहे हे मात्र नक्की. भवतु सब्ब मंगलम

# झेन कथा

झेन कथा : "बुद्ध आणि रिकाम्या प्याल्याचा धडा"

बुद्धाच्या काळात एक तरुण ब्राह्मण विद्यार्थी होता. त्याचे नाव देवदत्त. तो खूपच विद्वान, वेदपारंगत, शास्त्रज्ञानी कौतुक केलेला. त्याला आपल्या ज्ञानाचा फार अभिमान होता. गावोगाव त्याचे नाव घेतले जाई. पण त्याच्या मनात एक प्रश्न सतत कुरतडत राहिला — "जर माझ्याकडे इतकं ज्ञान आहे, तर मग मला शांती का मिळत नाही? रात्री झोप का लागत नाही? माझ्या अंतःकरणात रिकामेपण का आहे?"एके दिवशी त्याने ठरवलं — बुद्धांना भेटून पाहू.बुद्धांची भेट तो राजगृहात पोहोचला. जिथे बोधिसत्त्व शिष्यांना धम्म शिकवत होते, त्या विहारात गेला. शेकडो भिक्षू शांतपणे बसले होते, काही ध्यान करत होते, काही पाली सुत्ते पठण करत होते. त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच तेज होते. देवदत्त थोडा गोंधळला. तो म्हणाला – "मी शास्त्रज्ञ आहे, मी वेद, उपनिषदं, व्याकरण, ज्योतिष, सगळं शिकलो आहे. पण माझं मन अस्थिर आहे. गुरुदेव, तुम्ही मला शांती देऊ शकता का?"बुद्ध स्मितहास्य करत त्याच्याकडे पाहू लागले.प्याल्याची कथा बुद्धांनी भिक्षूंना सांगितलं – "एखादा प्याला समजा आधीच भरलेला आहे. जर कोणी त्यात आणखी पाणी ओतलं, तर काय होईल?" भिक्षूंनी उत्तर दिलं – "गुरुदेव, ते पाणी वाहून जाईल." बुद्ध हसले आणि देवदत्ताकडे पाहून म्हणाले – "तसाच तुझा प्याला आहे. तुझ्या ज्ञानाच्या गर्वाने तो भरलेला आहे. तू काहीही शिकलास, पण तुझ्या अंतःकरणात अहंकाराने सगळं व्यापलं आहे. त्यामुळे नवीन सत्याचा एक थेंबही आत मावत नाही." देवदत्त थोडा चिडला. त्याला वाटलं – "मी एवढं शिकलोय, तरी मला मूर्ख म्हणत आहेत का?" पण बुद्धांच्या डोळ्यातील शांतता त्याला भिडली.

प्रश्नांची ओढ देवदत्त म्हणाला – "मग गुरुदेव, मी काय करू? माझा प्याला रिकामा कसा होईल?" बुद्ध म्हणाले – "ध्यानात बस. श्वास घे, श्वास सोड. प्रत्येक क्षणी स्वतःला विचार – 'मी कोण आहे?' हे सगळं ज्ञान, पदवी, गौरव – क्षणभंगुर आहे. खरी शांती तेव्हा मिळेल, जेव्हा तू स्वतःला रिकामा करशील." देवदत्त आश्चर्यचकित झाला. त्याने पहिल्यांदाच आपले डोळे मिटले. श्वासावर लक्ष केंद्रित केले. अंतर्मनाची क्रांती सुरुवातीला त्याला त्रास झाला. मन इकडे-तिकडे भटकत होतं. वेदांचे श्लोक आठवत होते, लोकांचे कौतुक आठवत होते. पण पुन्हा-पुन्हा बुद्धांचा आवाज कानात घुमत होता – "रिकामा हो, रिकामा हो." थोड्या वेळाने त्याला जाणवलं की मन थोडं स्थिर झालंय. श्वास अगदी शांत होत चालला होता. मनात एक प्रकारची हलकी थंडावा आला. जणू काही बराच काळानंतर पहिला पाऊस पडला आणि कोरडी जमीन ओली झाली.

देवदत्तने डोळे उघडले. तो आश्चर्यचकित झाला – "गुरुदेव, हे काय झालं? मला एवढी शांती का वाटते आहे?" बुद्ध म्हणाले – "कारण तुझ्या प्याल्यातून अहंकाराचा थोडासा भाग सांडला. जिथे रिकामेपणा आहे, तिथे शांती आहे. जिथे शांती आहे, तिथे प्रज्ञा उगम पावते." खरी शिकवण देवदत्त हळूच म्हणाला – "मी इतकी वर्षे ग्रंथ वाचले, पण आज मला कळलं की खरी विद्या ही पुस्तकांत नाही, तर आपल्या अंतरंगात आहे." बुद्धांनी उत्तर दिलं – "विद्या म्हणजे फक्त ज्ञान नाही, तर प्रज्ञा आहे. ज्ञान म्हणजे ऐकलेले किंवा शिकलेले शब्द. पण प्रज्ञा म्हणजे त्या शब्दांमधील सत्य अनुभवणे. आणि हे अनुभवण्यासाठी तुला आधी स्वतःला रिकामं करावं लागतं." पुढचा प्रवास देवदत्ताने त्या दिवशी भिक्षुसंघरूपेक्षाही वेगळं ठरवलं. त्याने ठरवलं – "मी बुद्धांचा शिष्य होईन." त्याने आपले वेदांचे ग्रंथ बाजूला ठेवले आणि साध्या भिक्षूंसारखा केश कापला. पिवळा काषाय वस्त्र परिधान केला. आता तो दररोज ध्यान करत होता, भिक्षाटन करत होता. हळूहळू त्याच्या मनातील अभिमान नाहीसा झाला. त्याच्या चेहऱ्यावर तेच तेज आले, जे त्याने सुरुवातीला भिक्षूंत पाहिलं होतं.

कथेचा बोध

एके दिवशी तो आपल्या गावात गेला. गावकऱ्यांनी विचारलं – "देवदत्त, तू इतका मोठा विद्वान होतास, मग तू भिक्षू का झालास?" तो शांतपणे हसून म्हणाला – "पूर्वी माझा प्याला भरलेला होता, पण त्यात शांती नव्हती. आता माझा प्याला रिकामा आहे, आणि त्यात खऱ्या आनंदाचा झरा वाहतो आहे."

🌿 शेवटचा संदेश

बुद्धांनी दिलेला हा धडा आजही तितकाच खरा आहे –

जर आपलं मन ज्ञानाच्या गर्वाने भरलेलं असेल, तर नवं सत्य आपल्यात शिरत नाही.

जिथे रिकामेपणा आहे, तिथे नवं काही जन्म घेऊ शकतं.

खरी शांती आणि आनंद आपल्यातच आहे; फक्त आपल्याला आपला अहंकाराचा प्याला रिकामा करावा लागतो.



## शिलालेख, धम्म आणि सम्राट अशोक: इतिहासाचे जिवंत दस्ताऐवज

सम्राट अशोक यांचा मास्की लघु शिलालेख क्रमांक १ हा भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचा पुरातत्त्वीय अवशेष आहे. हा शिलालेख कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यातील मास्की येथील दुर्गदा-गुड्डा खडकावर कोरलेला आहे आणि इ.स.पू. २५८-२५७ च्या आसपासचा मानला जातो. हा शिलालेख प्राकृत भाषेत आणि धम्म लिपीत लिहिलेला आहे.

मास्की शिलालेखाबद्दल माहिती

१. शोध आणि स्थान:

शोध: मास्की शिलालेखाचा शोध १९१५ मध्ये ब्रिटिश पुरातत्त्वशास्त्रज्ञ सी. बीडन यांनी लावला.

स्थान: हा शिलालेख कर्नाटकातील रायचूर जिल्ह्यातील मास्की गावात दुर्गदा-गुड्डा नावाच्या खडकावर कोरलेला आहे.

संरक्षण: हा शिलालेख भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) द्वारे राष्ट्रीय महत्त्वाचा स्मारक (Monument of National Importance, क्रमांक: N-KA-D299) म्हणून संरक्षित आहे.

२. मजकूर आणि भाषा:

भाषा: शिलालेख प्राकृत (मागधी बोली) भाषेत आहे, जी त्या काळातील सामान्य लोकांची भाषा होती.

लिपी: धम्म लिपी, जी प्राचीन भारतीय लिपींपैकी एक आहे आणि डावीकडून उजवीकडे लिहिली जाते.

**देवनागरीत मजकूर:**

**देवानंपिय पियदस्सी असोक राजा कति:**

**अधिकानि अधतियानि वसानि यति संबुद्धे नो चु बहु पकारिते।**

**एकं वसं अधिकं च संबुद्धे मे पकारिते।**

**ये च जन हेवं मिशं लोके तेन धम्मेन संस्तुता।**

**बहु च तथ कचं लोके तेन धम्मेन संस्तुता।**


**एतं च अतिकंतं च विविधे धम्म-चरणे।**

**एता देवानंपियस लिखपिता।**

**मराठीत अर्थ:**

**"देवानांपिय पियदस्सी अशोक राजा म्हणतात: मी अडीच वर्षांहून अधिक काळ बौद्ध धर्मात आहे, पण पहिल्या वर्षी मी फार प्रयत्न केले नाहीत. आता एका वर्षापेक्षा जास्त काळ मी बौद्ध धर्मात आहे आणि खूप प्रयत्न केले आहेत. जे लोक यापूर्वी धम्मेत नव्हते, ते आता धम्मात सामील झाले आहेत. यामुळे लोकांमध्ये सुधारणा झाली आहे आणि यापुढेही होईल. हा संदेश सर्वत्र पसरवला जाईल."**

Inscriptions of Emperor Ashoka at Maski, District - Raichur, of State Karnataka, India.





## भारतीय बौद्ध महासभा तथा धम्म प्रचारक संघ द्वारा धम्म शिबीराचे आयोजन

सुरत (१० ऑगस्ट २०२५) :

भारतीय बौद्ध महासभा आणि धम्म प्रचारक संघ, सुरत यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत सारनाथ बुद्ध विहार, मोदी इस्टेट, नवागाम, सुरत येथे दर रविवारी दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत एक दिवसीय धम्म प्रशिक्षण शिबिर आयोजित केले जाते.

दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजीच्या शिबिरात

प्रवचनकार आदरणीय वाय. डी. सपकाळ गुरुजी यांनी आपल्या मधुर वाणीमधून बुद्ध वंदना या विषयावर प्रवचन दिले. मागील तीन आठवड्यांपासून ते भगवंत बुद्धांच्या नऊ गुणांचे विश्लेषण सुलभ भाषेत करत असून, यावेळी त्यांनी “लोकविदु” या गुणाचा सविस्तर ऊहापोह केला.भगवंत बुद्ध हे ३१ लोक जाणणारे होते, तसेच ८ निरय लोकांविषयीही त्यांनी सविस्तर माहिती दिली.

या शिबिरात उपस्थित बौद्धाचार्य अरविंद बैसाणे यांनीही धम्माविषयी मार्गदर्शन केले. तसेच आयु. दिलीप रामटेके यांचे सुपुत्र व माजी श्रामणेर सनी रामटेके यांनी आपल्या जीवनात धम्म कसा उपयुक्त आहे याबाबत मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात आनापानसती ध्यान साधना आणि वंदना याने झाली तर समारोप धम्मापालन गाथेने करण्यात आला.

धम्म जाणण्याची इच्छा असलेल्या सर्व श्रद्धावान उपासक-उपासिका यांनी दर रविवारी दुपारी २.०० वाजता सारनाथ बुद्ध विहार, मोदी इस्टेट, नवागाम, सुरत येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा अभ्यासवर्ग पूर्णतः निशुल्क आहे.

## श्रावण पौर्णिमेनिमित्त बीड येथे धम्मदेशना संपन्न

**बीड प्रतिनिधी –**

प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड महाविहार धम्मभूमी, भदंत आनंद कौशल्यायन नगर, मौजे शिवनी, ता. जि. बीड येथे दर पौर्णिमेला धम्मदेशना आयोजित केली जाते. या उपक्रमाद्वारे आचरणशील परंपरेची निर्मिती, पौर्णिमेचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे तसेच बौद्ध संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.

यंदाच्या श्रावण पौर्णिमा महोत्सवाच्या धम्मदेशनेत पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, “शिक्षणाचा उपयोग करून मोक्याच्या जागा मिळवा आणि त्या पदाचा उपयोग समाजाचे ऋण फेडण्यासाठी करा”.

धम्मदेशना कार्यक्रमास पूज्य भंते बुद्ध बोधी शिवणी यांची विशेष उपस्थिती होती. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, तसेच बहुसंख्य उपासक-उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर त्रिवार वंदनानंतर भिक्खु संघाच्या हस्ते उपस्थितांनी त्रिसरण व पंचशील ग्रहण केले.





कार्यक्रमात प्रमुख अतिथी इंजि. राजेंद्र घोडके (वरिष्ठ अरेखक, सां. भा. विभाग, लातूर), तसेच मनीषा अविनाश गंडले (सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र), सोनिया अविनाश गंडले (नवनियुक्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर), प्रा. सुशीलकुमार सांगवीकर (के.एस.के. कॉलेज, बीड), प्रिया प्रकाश खंदारे (विद्युत सहाय्यक) यांचा संस्थेतर्फे गौरव करण्यात आला.

सत्कारास उत्तर देताना मान्यवरांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांच्या कष्टांना दिले तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजऋण फेडण्याच्या उपदेशाप्रमाणे कार्यरत राहण्याचे आश्वासन दिले. धम्मदेशनेदरम्यान पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी मानवजीवनाचे महत्त्व, अत्त दीप भव, त्रिसरण, पंचशील, आर्य अष्टांगिक मार्ग व दहा पारमिता यांचा ऊहापोह करून उदाहरणांनी स्पष्ट केले. गृहस्थ जीवनातील परस्पर विश्वास, माता रमाई व बाबासाहेबांचे त्यागमय जीवन आणि समाजहितकारी ध्येय यांचा उल्लेख करून त्यांनी उपस्थितांना धम्ममय जीवन जगण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास धम्महॉलमध्ये अत्यंत शांत वातावरण लाभले असून प्रत्येकजण एकचित्ताने धम्मदेशनेत तल्लीन झाला होता. कार्यक्रमाच्या प्रसंगी कुसुम शंकरराव गायकवाड यांच्यातर्फे भोजनदान, तर धम्मदिना महिला मंडळ ताडसोणा यांच्यातर्फे खीरदान करण्यात आले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन परमेश्वर बनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन भास्कर सरपते यांनी केले. शेवटी पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांच्या आशीर्वाद गाथेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## त्रिपिटक MCQ प्रश्नोत्तरे

**ज्ञानमंजुषा – त्रिपिटक वार्तेतील लेखांवर आधारित प्रश्नसंच (साप्ताहिकातील लेखांवरून तयार केलेले अभ्यासपूर्ण प्रश्न)**

१. त्रिपिटकाची रचना कोणत्या भाषेत झाली?
a) संस्कृत b) पाली
c) प्राकृत d) हिंदी

२. त्रिपिटकाचे तीन विभाग कोणते आहेत?
a) विनयपिटक, सुत्तपिटक, अभिधम्मपिटक
b) सूत्रपिटक, उपनिषद, गीता
c) आचारपिटक, ज्ञानपिटक, साधनपिटक
d) वेद, ब्राह्मण, आरण्यक

३. विनयपिटकात मुख्यतः कोणत्या गोष्टींचा उल्लेख आहे?
a) ध्यानपद्धती
b) भिक्षू-भिक्षुणींचे नियम व आचारसंहिता
c) तत्त्वज्ञान
d) जातककथा

४. दीर्घनिकाय कोणत्या पिटकात येतो?
a) विनयपिटक b) सुत्तपिटक
c) अभिधम्मपिटक d) जातकपिटक

५. अभिधम्मपिटकाचे वैशिष्ट्य काय आहे?
a) नियमसंहिता b) बुद्धाच्या प्रवचने
c) मानसशास्त्रीय व तत्त्वज्ञानात्मक विश्लेषण
d) कथा-कहाण्या

६. त्रिपिटकाचे पहिले संकलन कोठे झाले?
a) वैशाली b) राजगृह
c) पाटलीपुत्र d) सारनाथ

७. त्रिपिटकाला बौद्ध परंपरेत काय मानले जाते?
a) वेद b) धर्मग्रंथ
c) उपनिषद d) काव्यग्रंथ

८. सुत्तपिटकात किती प्रमुख निकाय आहेत?
a) ३ b) ४ c) ५ d) ६

९. अंगुत्तरनिकायमध्ये प्रवचनांची मांडणी कशी केली आहे?
a) दीर्घ संवादरूप b) लहान संवादरूप
c) वाढत्या क्रमाने संख्यात्मक पद्धतीने
d) कथा-काव्यरूप

१०. श्रीलंकेत त्रिपिटकाच्या संरक्षणासाठी कोणता राजा प्रसिद्ध होता?
a) अशोक b) बिंबिसार
c) वट्टगामणी अभय d) कनिष्क

**त्रिपिटक वार्ता – पालि भाषेच्या प्रचारासाठी समर्पित साप्ताहिक!**

बौद्ध विहार, धम्मसेवक आणि संघटना यांची माहिती पाठवा! "त्रिपिटक वार्ता – पालि भाषेच्या मराठी साप्ताहिकामध्ये" आम्ही दर आठवड्याला खालील समाजप्रबोधनात्मक विभाग चालू करत आहोत: 🔹 १. विहार परिचय विभाग 🔹 २. धम्मसेवक (धम्मकार्य करणाऱ्या व्यक्तींचा परिचय) 🔹 ३. बौद्ध धार्मिक संघटना परिचय, माहितीमध्ये खालील तपशील असावा: 🔸 विहारासाठी: विहाराचे नाव, स्थान, स्थापनेचा इतिहास, प्रमुख भंते/सेवकांचे नाव उपासना, शिबिरे, विशेष कार्यक्रम, एक फोटो (विहार/कार्यक्रमाचा) 🔸 धम्मसेवकासाठी: नाव, शहर, कार्यक्षेत्र, प्रेरणा, योगदान, एक फोटो 🔸 संघटनेसाठी: संघटनेचे नाव, स्थापना वर्ष,उद्दिष्ट, प्रमुख कार्य, विशेष प्रकल्प/कार्यक्रम, एक फोटो (कार्यक्रम/बॅनर) 📩 ही माहिती खालील WHATSAPP नंबरवर पाठवा: 📱 9139509355 📅 दर आठवड्याला नवीन माहिती प्रसिद्ध केली जाईल. लवकरात लवकर आपली माहिती पाठवा! "आपल्या योगदानातून उजळेल त्रिसरण आणि पाली भाषेचा दीप!" त्रिपिटक वार्ता – पालि चा प्रचार, धम्माचा प्रसार!

# धम्मपद

**गाथा क्रमांक ६० (बाल वग्ग)**
**पालि (मूळ मजकूर):**

**दीघा जागरतो रत्ति, दीघं सन्तस्स योजनं।**
**दीघो बालानं संसारो, सद्धम्मं अविजानतं।**

**मराठी अनुवाद:**
**मूर्खासाठी रात्र दीर्घ आहे, थकलेल्यासाठी प्रवास लांब आहे।**
**जो खरा धम्म (सत्य) जाणत नाही, त्याच्यासाठी संसार (जन्म-मरणाचे चक्र) दीर्घ आहे।**

**हिन्दी अनुवाद:**
**मूर्ख के लिए रात लंबी है, थके हुए के लिए यात्रा लंबी है।**
**जो सच्चा धर्म (धम्म) नहीं जानता, उसके लिए संसार (जन्म-मरण का चक्र) लंबा है।**

**इंग्लिश अनुवाद:**
**Long is the night for the wakeful, long is the journey for the weary.**
**Long is the cycle of existence (samsara) for the fool who does not know the true Dhamma.**

अर्थ: ही गाथा अज्ञान (मूर्खपणा) आणि खऱ्या धम्माच्या (बौद्ध शिकवणी) अभावामुळे संसाराच्या चक्रात अडकण्याची तुलना करते. ज्याप्रमाणे रात्र जागरणाऱ्यासाठी आणि प्रवास थकलेल्यासाठी लांब वाटतो, त्याचप्रमाणे धम्म न जाणणाऱ्या मूर्खासाठी संसाराचा प्रवास अंतहीन आणि दुखदायी आहे. महत्त्व: ही गाथा धम्माचे पालन आणि बुद्धाच्या शिकवणींचे महत्त्व अधोरेखित करते, ज्यामुळे व्यक्ती संसारातून मुक्त होऊ शकते.

## लहान मुलांचे सदर ! चला रंग भरू या!



हे साप्ताहिक मालक, संपादक व प्रकाशक – अनिल आनंद सुरडकर | यांनी मुद्रक – जितेंद्र महादेव रसकर | मुद्रण – श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, पुणे – ४११००२ येथे छापून | प्रकाशन पत्ता – हाउस नं. २, बिल्डिंग नं. ५, सर्वे नं. ०८, सातववाडी, हडपसर, पुणे – ४११०२८ येथून प्रकाशित केले | RNI.NO – MHMUL/25/A1620 | MO.NO : +91 8805118839 / सर्व कायदेशीर बाबी पुणे न्याय क्षेत्रात येतील | "या अंकात प्रसिद्ध झालेले बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही."